# प्रेस नोट दि.२८/१०/२०१७

## (फसवणुकीचे गुन्हयातील फरारी असलेल्या आरोपीस गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड दक्षिण विभागाने केले अटक )

---

पुणे शहर गुन्हेशाखे कडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागा मध्ये कार्यरत असणारे पोनिरी श्री.राम राजमाने व त्यांचा स्टाफ हे दि.२७/१०/२०१७ रोजी कोथरुड पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना स्कॉड मधील पोलीस कर्मचारी प्रशांत पवार यांना त्यांचे बातमीदारा कडुन बातमी मिळाली कि, पौडरोड,कचरा डेपोचे जवळील बाबाज गार्डन समोर रोडवर एका इसमाने पिवळया रंगाचा शर्ट व राखाडी रंगाची पॅंट घेतलेली असुन तो संशयीतरित्या थांबलेला आहे, वगैरे मजकुरची बातमी मिळाल्याने सदर ठिक्राणी जावून खात्री करता नमुद वर्णनाचा इसम दिसुन आल्याने सदरचे इसमास १७/४५ वा. ताब्यात घेवून त्यास नाव पत्ता विचारता त्याने स्वताचे नाव दिनेश रामचंद्र भोईर वय २७ रा.मु.पो.बोरवली पो.सुगवे ता.कर्जत जि.रायगड असे सांगीतल्याने सदर ठिकाणी येणेबाबत चौकशी करता तो उडवा-उडवीची उत्तरे देवु लागल्याने त्याचा संशय आल्याने त्याचेबाबत अधिक माहीती घेता त्याचे विरुध्द नेरुळ पो.स्टे.गु.र.नं.२०९/२०१६ भा.द.वि.क ४२०,४६४,४६७,४६८,४७१,३४ येथे गुन्हा दाखल असल्याची व सदर गुन्हयात तो परागंदा (फरारी ) असल्याची माहिती प्राप्त झाल्याने त्यास पुढील कारवाईकामी नेरळ पोलीस स्टेशनचे ताब्यात देणेत आले आहे.

वर नमुद आरोपीचे विरुध्द राययगड जिल्हयातील खोपोली,कर्जत,नेरळ,पो.स्टे. व ठाणे जिल्हयातील नवे नगर पो.स्टे.येथे फसवणुकीचे असे एकुण ५ गुन्हे दाखल आहेत, तसेच तो मिळुन येत नसल्याने मा.प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी सो,कर्जत यांनी प्रोक्लोमेशन (जाहिरनामा ) प्रसिध्द केलेला आहे.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे.श्री.सुधीर हिरेमठ सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे.श्री.समीर शेख व श्री.सुरेश भोसले सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान,रविंद्र कदम, , प्रशांत पवार,गणेश साळुकें,सुनिल चिखले,प्रविण तापकीर विवेक जाधव, अजय उत्तेकर, कैलास साळुके, प्रविण पडवळ, राकेश खुणवे यांनी केली आहे.